जगात महाराष्ट्राचा डंका

वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमचा वैश्विक कृषी पुरस्कार जाहीर

२६ ऑगस्टला होणार पुरस्काराचे वितरण

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कृषी क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याने, वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमचा वैश्विक कृषी पुरस्कार २०२४ महाराष्ट्राला जाहीर झाला आहे. फोरमच्या चेअरमन प्रा. रुडी रॅबिंग्ज यांनी पत्राद्वारे याबाबत माहिती दिली. अमेरिकेतील वॉशिंग्टन डीसी येथे २६ ऑगस्ट रोजी या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. एक लाख डॉलर रक्कम, चांदीची ट्रॉफी आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारामुळे जगात महाराष्ट्राचा डंका वाजला आहे.

युनोचे सरचिटणीस ॲण्टिवो गुट्रेस यांनी शाश्वत विकास, हवामान बदलाशी लढा आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याचे आवाहन केले होते. मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र शासनाने या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत, राज्यात पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून घेतली गेलेली शाश्वत विकास धोरणे राबवली. हे सर्व प्रयत्न आणि पर्यावरण, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी उचललेल्या पावलांची दखल घेत वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरम २०२४ चे दुसरे जागतिक कृषी, पर्यावरण पारितोषिक महाराष्ट्राला जाहीर झाले. या पुरस्कारांसाठी राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेतल्याची माहिती कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली आहे.

महाराष्ट्राने अनेक परिवर्तनकारी निर्णय घेतले. २१ लाख हेक्टर क्षेत्रावर देशातील सर्वात मोठे बांबू मिशन राबवण्याचा निर्णय घेतला. नंदुरबार येथील धडगाव तालुक्यातील ७० गावच्या सरपंचांनी केंद्रीय फलोत्पादन सचिव प्रभात कुमार यांच्यासमोरच आमचा प्रश्न बांबू लागवडीशिवाय सुटणार नाही, अशी मागणी केली. केंद्रानेही त्याला होकार दिला. या वर्षीच्या राज्याच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री अजित पवार यांनी नंदूरबार जिल्ह्यातील एक लाख २० हजार एकर जमिनीमध्ये केंद्र आणि राज्य मिळून हरित पट्टा निर्माण करण्याचे जाहीर केले. या अभियानासाठी अर्थमंत्री म्हणून उपमुख्यमंत्री पवार यांनी अर्थसंकल्पातही तरतूद केली आहे. याशिवाय सरकारने १२३ प्रकल्पांना मार्गी लावून सुमारे १७ लाख हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण करण्याचा चंग बांधला आहे, असेही पटेल यांनी म्हटले आहे.

वर्ल्ड ॲग्रीकल्चर फोरमतर्फे २०१८ पासून हा पुरस्कार देण्यात येतो. सर्वात प्रथम विश्वविख्यात कृषी शास्त्रज्ञ प्रा. स्वामीनाथन या पुरस्काराचे मानकरी ठरले. त्यांच्यानंतर मुख्यमंत्री शिंदे या पुरस्कारचे मानकरी ठरले आहेत. यापूर्वी १० जुलै रोजी दिल्ली येथील ॲग्रीकल्चर टुडे ग्रुपतर्फे महाराष्ट्राला पुरस्कार प्रदान केला होता. या पुरस्काराची दखल जगाने घेतली व महाराष्ट्राने पर्यावरण रक्षण, शाश्वत विकासासाठी केलेल्या कामाची दिशा जगाला भावली म्हणूनच या पुरस्कारासाठी एकनाथ शिंदे यांची निवड करण्यात आल्याचे पटेल म्हणाले.

अनुसूचित जातींच्या उप-वर्गीकरणाचा राज्यांना अधिकार

(पान १ वरून) उचित ठरवता येते, असे घटनापीठाने नमूद केले. राज्यघटनेच्या कलम १५ (धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थळ या कारणांवरून कोणत्याही नागरिकाविरुद्ध भेदभाव न करता) आणि १६ (सार्वजनिक नोकरीतील संधीची समता) नुसार राज्य सरकार आपला अधिकार वापरण्यास स्वतंत्र आहे, असे सरन्यायाधीशांनी म्हटले आहे. तर न्या. बेला एम. त्रिवेदी यांनी एससीतील उप-वर्गीकरणाशी असहमती दर्शवली. कलम ३४१ नुसार अधिसूचित जातींच्या यादीत राज्य सरकारे बदल करू शकत नाहीत. हा अधिकार केवळ संसदेला प्राप्त आहे. राज्यांची सकारात्मक कारवाई राज्यघटनेच्या कक्षेत असली पाहिजे, असे त्रिवेदी म्हणाले. या सुनावणीवेळी न्या. ई. व्ही. चिन्नैया विरुद्ध आंध्र प्रदेश यांच्यातील प्रकरणाचा २००४ सालचा फैसला बदलण्यात आला आहे. एससी समुदायातील आरक्षण उप-वर्गीकरणाला नकार दिला होता. अनेक पिढ्यांपासून बहिष्कार, भेदभाव व अपमान सहन करणारा एससी हा स्वजातीय समुदाय असून, तो मागासवर्गाचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे त्यांच्या आरक्षणात फोड करता येणार नसल्याचे त्यांचे म्हणणे होते. पण न्या. चिन्नैयांचा निकाल ७ सदस्यीय घटनापीठाने बदलला आहे. एससी समुदायाचे सदस्य व्यवस्थात्मक भेदभावामुळे प्रगती करू शकत नाहीत. त्यामुळे राज्य सरकारला उप-वर्गीकरण करण्याचा अधिकार असल्याचे घटनापीठाने स्पष्ट केले.

ओबीसीप्रमाणेच क्रिमिलेअर लागू करा – न्या. गवई

अनुसूचित जातींचे उप-वर्गीकरण करण्यात घटनात्मक अडथळा नाही. इतर मागासवर्गीयांप्रमाणेच (ओबीसी) एससी प्रवर्गात क्रिमिलेअरची अट लागू करावी. अधिक उत्पन्न असणाऱ्यांना या कक्षेबाहेर ठेवावे, असे न्या. बी. आर. गवई यांनी स्वतःच्या २८१ पृष्ठांच्या वेगळ्या निकालात स्पष्ट केले. सरकारी नोकऱ्यांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व नसलेल्या मागासवर्गीयांना प्राधान्य देणे राज्यांचे कर्तव्य आहे. या माध्यमातूनच खरी समता प्रस्थापित करता येईल, असे त्यांनी सांगितले. न्या. विक्रम नाथ यांनीही क्रिमिलेअरच्या अटीचे समर्थन केले.

त्र्यंबकेश्वर मंदिरातील विशेष दर्शन श्रावणात बंद!

(पान १ वरून) त्र्यंबकेश्वरमध्ये श्रावणात भाविकांची संख्या नेहमीपेक्षा कित्येक पटींनी वाढते. दर्शनासाठी ताटकळणारे भाविक आणि मंदिरातील सुरक्षा रक्षकांमध्ये काही वेळा वाद होतात. सुरक्षा रक्षकांनी भाविकांना मारहाण केल्याच्या तक्रारीही झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, जिल्हा प्रशासनाच्या सूचनेनुसार देवस्थानने श्रावण महिन्यात शासन, जिल्हा प्रशासनाकडून पत्रव्यवहार होणाऱ्या राजशिष्टाचाराशी संबंधित व्यक्ती वगळता अन्य सर्व विशेष (व्हीआयपी) दर्शन १० सप्टेंबरपर्यंत बंद केले आहे. या काळात व अन्य वेळीही अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या संख्येवर मर्यादा घालून त्यांची दर्शनाची वेळ निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सकाळी ७ ते १० आणि सायंकाळी ६ ते ७ या वेळेत प्रतिदिन २० अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या दर्शनाची व्यवस्था केली जाईल. याव्यतिरिक्त अन्य सर्व प्रकारचे विशेष दर्शन या काळात बंद करण्यात आल्याचे देवस्थानने म्हटले आहे. धर्मदर्शन आणि देणगी दर्शन नोंदणी ऑनलाइन करण्याची व्यवस्था लवकरच कार्यान्वित केली जात आहे.

स्थानिक ग्रामस्थांसाठी विशेष वेळ

स्थानिक ग्रामस्थांना पहाटे मंदिर उघडल्यापासून सकाळी १०.३० वाजेपर्यंत आणि सायंकाळी ६ ते ८ ही वेळ निश्चित करण्यात आली आहे. गर्दीमुळे मंदिर परिसरातून भाविकांना बाहेर निघण्यासाठी दक्षिण दरवाजा (गायत्री मंदिर गेट) निश्चित करण्यात आला आहे. भाविकांना सूचना देण्यासाठी ध्वनिक्षेपक यंत्रणा, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असणार आहे. दर्शनरांगेत उभे न राहणाऱ्या भाविकांसाठी उत्तर महाद्वार प्रवेशद्वारासमोर, तीर्थराज कुशावर्त व जव्हार फाटा येथे एलईडी पडद्यांवर थेट दर्शनाची व्यवस्था करण्यात आल्याचे देवस्थानने म्हटले आहे.

नगर परिषदेतर्फे तयारी

श्रावण महिन्यात गर्दीचे नियोजन करण्यासाठी त्र्यंबकेश्वरमध्ये विविध ठिकाणी लोखंडी अडथळे उभारले जातात. गणपतीबारी, बिल्वतीर्थ, नवीन बस स्थानक या ठिकाणी त्र्यंबकेश्वर नगर परिषदेकडून तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था केली जाणार आहे. मंदिर परिसरासह शहरातील अन्य भागात स्वच्छता ठेवण्याचे काम अहोरात्र केले जाईल. श्रावणातील गर्दी लक्षात घेऊन संत गजानन महाराज चौक ते कुशावर्त तीर्थदरम्यानचे अतिक्रमण काढले जात आहे. शहरातील आणि फेरी मार्गावरील संपूर्ण विद्युत व्यवस्था नगर परिषदेकडून केली जाणार असल्याचे मुख्याधिकारी श्रेया देवचक्के यांनी सांगितले.

मराठा समाज अपवादात्मक मागासलेला – आरक्षणाला पात्र

(पान १ वरून) घेत रिट याचिका दाखल केल्या. तर सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब पवार यांच्या जनहित याचिकेसह सुमारे १८ याचिकांची एकत्रित सुनावणी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनिवाला यांच्या त्रिसदस्य पूर्णपीठासमोर सुरू आहे. मागील सुनावणीवेळी पूर्णपीठाने मागासवर्ग आयोगाला या याचिकांमध्ये प्रतिवादी करून भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मागासवर्ग आयोगाने प्रतिज्ञापत्र सादर करून मराठा आरक्षणाचे समर्थन केले आहे. गेल्या दहा वर्षांत खुल्या प्रवर्गातील व्यक्तींनी केलेल्या आत्महत्यांमध्ये ९४ टक्क्यांहून अधिक व्यक्ती या मराठा समाजातील आहेत. आयोगाने आरक्षणापूर्वी परिमाणात्मक संशोधन तसेच मागील समित्यांनी केलेल्या अहवाल व त्यातील शिफारशींचाही अभ्यास करून आपला अहवाल सादर केला आहे. या अहवालानुसार राज्य सरकारने १० टक्के आरक्षण दिल्यामुळे राज्यातील आरक्षणावरील ५० टक्के मर्यादा ओलांडली असली तरी ती अपवादात्मक आहे. ही मर्यादा फक्त निर्देशिका आहे ती अनिवार्य नाही. ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यास कोणताही प्रतिबंध नाही, असेही प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे.

मराठा समाजाची उन्नती नाही

मराठा समाजाच्या या मागासलेपणाकडे अपवादात्मकतेने पाहावे लागले. भारतासारख्या आर्थिक वृद्धी होत असलेल्या देशात मराठा समाजाची उन्नती होताना दिसून येत नाही. सद्यस्थितीत मराठा समाज हा दयनीय स्थितीत असून त्यांचा आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा दिसून येतो. या समाजाला मुख्य प्रवाहाच्या अंधाऱ्या किनाऱ्यावर लोटले गेले आहे. त्यामुळे मराठा समाजाला खऱ्या अर्थाने समाजाच्या मुख्य प्रवाहाचा भाग मानला जाऊ शकत नाही.

आत्महत्येमध्ये मराठा शेतकरी

सामाजिक व्यवस्थेत आपली स्थिती सुधारण्याच्या संधींच्या अभावामुळे उद्भवलेल्या चिंताजनक परिस्थितीतून बाहेर येण्याचा कोणताही मार्ग नसल्यानेच एखादी व्यक्ती टोकाचे पाऊल उचलते. मराठा समाजावर अशी परिस्थिती ओढवल्यानेच २०१८ ते २०२३ या काळात इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या तुलनेत मराठा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे.

आव्हान द्यायला मनगटात जोर लागतो

(पान १ वरून) यांच्यावर हल्लाबोल केला होता. उद्धव ठाकरेंच्या या टीकेवर फडणवीस यांनी अद्यापि भाष्य केलेले नाही. पण मुख्यमंत्री शिंदे यांनी फडणवीस यांच्यासमोरच उद्धव ठाकरेंवर हल्ला चढवला. शिंदे म्हणाले, महायुती सरकारच्या कल्याणकारी योजनांमुळे आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे विरोधकांच्या पायाखालची जमीन सरकली आहे. सरकारने आणलेल्या योजनांचा घाव वर्मी लागला आहे. याची महाविकास आघाडीला विशेषतः काहींना (उद्धव ठाकरे) पोटदुखी झाली आहे. आता फडणवीस यांना संपवण्याची भाषा केली जात आहे. कुणाला संपवण्याची भाषा राजकारणात करू नये. मानसिकदृष्ट्या ते तणावाखाली आल्याने अशी भाषा करत आहेत. फडणवीस यांनी राज्यात केलेल्या कामांमुळे संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्यासोबत आहे. पण कोणी आव्हानाची भाषा करत असेल तर त्यांनी आपण कुठे आहोत, याचा विचार करावा. आव्हान देण्यासाठी मनगटात जोर असावा लागतो, असेही शिंदे यांनी ठाकरे यांना सुनावले.

श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरण सुनावणीयोग्य!

(पान १ वरून) दिली होती, तर मुस्लिम पक्षाने हे प्रकरण सुनावणीयोग्य नसल्याचे सांगत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. १२ ऑक्टोबर १९६८ रोजी आपल्या पक्षाने एक तडजोड केली होती. याची पुष्टी १९७४ साली दिलेल्या एका दिवाणी खटल्याच्या निर्णयात करण्यात आली आहे. कायद्यानुसार एका तडजोडीला आव्हान देण्याची कालमर्यादा ही तीन वर्षे आहे. पण हे प्रकरण २०२० साली न्यायालयात खेचण्यात आले. हे वेळेचे उल्लंघन असून त्यावर सुनावणी केली जाऊ नये, असा युक्तिवाद मुस्लिम पक्षाने केला होता. परंतु, उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. मशीद हटवत त्या ठिकाणी मंदिराचे पुनर्निर्माण करण्याच्या मागणीसह अनेक याचिका हिंदू पक्षाकडून दाखल करण्यात आलेल्या आहेत.

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

ई-निविदा सूचना

कार्यकारी अभियंता [पश्चिम] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दूरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे/सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी/एमईएस/मुंबई महानगरपालिका/सिडको/रेल्वे/ बीपीटी/एमआयडीसी/एम.जे.पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण ३ कामांकरीता बी-१ (Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	टप्पा	कालावधी	अ. क्र.	टप्पा	कालावधी
१.	निविदा विक्री सुरू	०३/०८/२०२४ सकाळी १०:३० वाजता	२.	निविदा विक्री बंद	१०/०८/२०२४ सायं. ६:१५ वाजता
३.	तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक	१३/०८/२०२४ सकाळी १०:३० नंतर	४.	आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक	१६/०८/२०२४ सकाळी १०:३० नंतर

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई-निविदा सूचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सूचनेबाबत शुद्धीपत्रक/बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

सही/-
कार्यकारी अभियंता (प.)
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई.

CPRO/A/546
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

बृहन्मुंबई महानगरपालिका
मनोहर वामन देसाई महा. जन. हॉस्पिटल, मालाड (पू.), मुंबई-४०० ०९७
क्र. एचओ/१८८७/एमडब्ल्यूडीएच दिनांक : ०१.०८.२०२४

ई-निविदा सूचना

बीएमसीच्या बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्या वतीने आणि करिता खाली दिलेल्या कामासाठी वैद्यकीय अधीक्षक-एम.डब्ल्यू. देसाई रुग्णालयाद्वारे ऑनलाइन निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत.

अ. क्र.	बोली क्र.	वस्तूचे वर्णन	परिमाण
१	२०२४_एमसीजीएम_१०५७०४५_१	एम. डब्ल्यू. देसाई रुग्णालय येथे बॅरियर परिक्षेत्र स्थापना आणि सुरक्षित करणे.	१ काम

बोली सुरू : ०२.०८.२०२४ रोजी १०.०० वा.
बोली समाप्ती : ०८.०८.२०२४ रोजी १६.०० वा.
दूर.क्र. : ०२२२८७७०००७ विस्ता. क्र.:- २१.
संपूर्ण ई-निविदा दस्तावेज ई-निविदा पोर्टल http://portal.www.mcgm.gov.in वर उपलब्ध आहे. ई-निविदा ई-निविदा दस्तावेजानुसार ऑनलाइन सादर करावी.

हस्ता./-
मुख्य वैद्यकीय अधीक्षक
एम. डब्ल्यू. देसाई रुग्णालय, मालाड (पू.)
पीआरओ/७७४/जाहि./२०२४-२५

आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळा

जितो एज्युकेशन अँड मेडिकल ट्रस्ट (महावीर जैन ट्रस्ट) संचलित
नोंदणी क्र. ई-१०८३० ठाणे.
श्रीमती विमलादेवी ख्यालीलालजी वागरेचा परिचारिका महाविद्यालय
लोबल हॉस्पिटल, साकेत, माजीवडा, बाळकुम, ठाणे (प.) - ४०० ६०८.

प्रवेश सूचना

सन २०२४-२५ करिता महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने खालील कोर्ससाठी प्रवेश सुरू करण्यात आले आहेत.
१) जी.एन.एम. (३ वर्ष) - पात्रता १२ वी उत्तीर्ण (किमान ४०%) सन २०२४-२५ वर्षाकरिता शासनमान्य जी.एन.एम. साठी रिक्त असलेल्या जागेकरिता (G.N.M.)
२) सर्टिफिकेट कोर्स इन रेडिओलॉजी टेक्निशियन - १ वर्ष (१० वी उत्तीर्ण)
३) सर्टिफिकेट कोर्स इन पॅथॉलॉजी टेक्निशियन - १ वर्ष (१० वी उत्तीर्ण)
४) डिप्लोमा कोर्स इन डायलेसिस टेक्नॉलॉजी - २ वर्ष (१० वी उत्तीर्ण)

प्रवेशासाठी संपर्क:
भ्रमणध्वनी क्र. 9892373100/8976982999

Hon. Babasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project
E-TENDER NOTICE NO: (2024_DOAWB_1062761)
SUPPLY, INSTALLATION, COMMISSIONING OF PUFF PANEL & REFRIGERATION SYSTEM CONDENSING UNIT WITH SUITABLE EVAPORATOR FOR ANPHALE FRESH FRUIT FARMER AGRO PRODUCER COMPANY LTD. ANPHALE TA-KHATAV DIST- SATARA
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **ANPHALE FRESH FRUIT FARMER AGRO PRODUCER COMPANY LTD. ANPHALE TA-KHATAV DIST- SATARA** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org, in** tender and procurement section. The last date for submission of online bid is **21/08/2024 up to 3.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.
District Implementation Unit, SMART Project Dist. Satara.

साई मल्हार को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.
नोंदणी क्र. एमयुएम/एमएमआरडीए/एचएसजी /(टीसी) /४०७/२०२१-२२
परिशिष्ट क्रमांक १६
उपविधी क्रमांक ३५ अन्वये
नोटिस

या नोटीसव्दारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील संस्थेतील **साई मल्हार को. ऑप. हौ. सोसा. लि., इमारत क्र. ३३/बी, एमएमआरडीए वसाहत, आर.एन.ए. पार्क जवळ, वाशीनाका चेंबूर, मुंबई ४०० ०७४** असून या संस्थेत खालील दिलेल्या विवरण व माहितीप्रमाणे खालील मयत सभासदांच्या नावे सदनिका असून त्यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या खालील वारसांनी त्यांच्या नावे सदनिका हस्तांतरीत करणे व संस्थेचे सभासद करून घेण्याकरिता संस्थेकडे लेखी अर्ज केला आहे. संस्थेच्या मयत सभासदाने महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायदा १९६० नियम १९६१ व उपविधीतील तरतदीनुसार संस्थेकडे वारस नोंद केलेली नाही. अर्ज केलेल्या खालील वारसदार व्यतिरिक्त इतर कोणीही मुळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा अर्जातील वारसदाराबाबत इतर कोणीही मुळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा वारसदाराबाबत इतर कायदेशीर सहवारसदांची काही हरकत असल्यास अशा वारसदारानी तसेच सदर सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा बँका, वित्त संस्था किंवा कोणीही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर बोजा असल्यास अशा व्यक्ती किंवा संस्थांनी सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत वरील संस्थेचे सचिव यांच्याशी पूर्व सूचना व वेळ घेऊन प्रत्यक्ष कायदेशीर मुळ कागदपत्र व पुराव्यासह कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६ ते ९ या वेळेत संपर्क साधावा. विहीत मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास संस्थेकडे वारसदार म्हणून अर्ज केलेले अर्जदारच त्या मयत सभासदांच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार आहेत. असे समजून संस्था अशा अर्जदार व्यक्तीच्या नावे त्या मयत सभासदाचे भाग व संस्थेतील सदनिका हस्तांतरीत करेल व कायदेशीर कारवाईकरीता संबंधीत प्रशासकीय कार्यालयाकडे शिफारस करेल. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे अर्ज कार्यकारी मंडळ विचारात घेणार नाहीत किंवा कोणत्याही प्रकारची कायदेशीर नुकसान भरपाई करण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाची असणार नाही.

मयत सभासद सदनिकाधारक व त्यांची अर्जदार वारसांची सूची

अनु क्र.	रूम नं.	मयत सभासदाचे नांव	अर्जदार वारसाचे नांव	नाते
1	बी /303	कै. श्री. अंकुश पांडुरंग पाटील	श्रीमती. जनाबाई अंकुश पाटील	पत्नी

साई मल्हार को-ऑ. हौ. सोसायटी लिमिटेड
शिक्का
सही/- अध्यक्ष
सही/- सेक्रेटरी
सही/- खजिनदार

श्री जय हनुमान को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.
नोंदणी क्र. एमयूएम/एमएमआरडीए/एचएसजी/(टीसी)/२६३/२०११-१२
परिशिष्ट क्रमांक-१६
उपविधी क्रमांक ३५ अन्वये
नोटीस

या नोटिसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील संस्थेतील **श्री जय हनुमान को. ऑप. हौ. सोसा. लि., इमारत क्र. १२, एमएमआरडीए कॉलनी, स्टेशन रोड, कांजुरमार्ग (प.), मुंबई – ४०० ०७८** असून या संस्थेत खालील दिलेल्या विवरण व माहितीप्रमाणे खालील मयत सभासदांच्या नांवे सदनिका असून त्यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या खालील वारसांनी त्यांच्या नांवे सदनिका हस्तांतरीत करणे व संस्थेचे सभासद करून घेण्याकरिता संस्थेकडे लेखी अर्ज केला आहे. संस्थेच्या मयत सभासदाने महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायदा १९६० नियम १९६१ व उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेकडे वारस नोंद केलेली नाही. अर्ज केलेल्या खालील वारसदार व्यतिरिक्त इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा अर्जातील वारसदाराबाबत इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा वारसदाराबाबत इतर कायदेशीर सहवारसदारांची काही हरकत असल्यास अशा वारसदारांनी तसेच सदर सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा बँका, वित्त संस्था किंवा कोणीही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर बोजा असल्यास अशा व्यक्ती किंवा संस्थांनी सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत वरील संस्थेचे सचिव यांच्याशी पूर्व सूचना व वेळ घेऊन प्रत्यक्ष कायदेशीर मूळ कागदपत्र व पुराव्यासह कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६ ते ९ या वेळेत संपर्क साधावा. विहीत मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास संस्थेकडे वारसदार म्हणून अर्ज केलेले अर्जदारच त्या मयत सभासदांच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्ज केलेले अर्जदारच त्या मयत सभासदांच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार आहेत. असे समजून संस्था अशा अर्जदार व्यक्तीच्या नावे त्या मयत सभासदाचे भाग व संस्थेतील सदनिका हस्तांतरीत करेल व कायदेशीर कार्यवाहीकरिता संबंधित प्रशासकीय कार्यालयाकडे शिफारस करेल. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे अर्ज कार्यकारी मंडळ विचारात घेणार नाहीत किंवा कोणत्याही प्रकारची कायदेशीर नुकसान भरपाई करण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाची असणार नाही.

मयत सभासद सदनिकाधारक व त्यांची अर्जदार वारसांची सूची

अ. क्र.	रूम नं.	मयत सभासदाचे नांव	अर्जदार वारसाचे नांव	नाते
१	२२३	कै. श्री. फुलचंद रामप्यारे यादव	श्री. नंदजी फुलचंद यादव	मुलगा

श्री जय हनुमान को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.
सही/-
शिक्का
अस्मिता अ. निकम
प्राधिकृत अधिकारी
तथा प्रमाणित लेखा परीक्षक
पॅनल नं. SGD678

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई
जा.क्र. झोपुप्रा/सहनि/अ-१/SRA/CO/OW/३९२४१ / सन २०२४
सहकार कक्ष, झो.पु.प्रा.. मुंबई, दिनांक : २४.०७.२०२४

-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-

(नियोजित) तारा कम्पाऊंड एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, न.भु.क्र. ३ / अ (भाग), मौजे आंबिवली, तालुका अंधेरी, यादव नगर, बांदिवली, हिल रोड, जोगेश्वरी (प), मुंबई- ४००१०२ या नियोजित संस्थेचा प्राधिकरणाकडिल परिपत्रक क्र. १४४ नुसार प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर संस्थेची सर्वसाधारण सभा घेण्यासाठी मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (पुर्व व पश्चिम उपनगरे), झो.पु.प्रा., मुंबई यांचेकडिल दिनांक २३.०७.२०२४ रोजीच्या पत्रानुसार मी निम्न स्वाक्षरीकार माझी प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १४४ (ड) दिनांक २३.०४.२०२४ नुसार सदरची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक १४.०८.२०२४ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्थळ : MR बॅन्क्युएट हॉल, सहकार रोड, जोगेश्वरी हॉस्पिटलजवळ, जोगेश्वरी (प), मुंबई-४००१०२** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस संस्था व विकासक यांनी सादर केलेल्या प्रारूप यादीतील झोपडीधारकांनीच उपस्थित राहावे. कृपया याबाबत नोंद घ्यावी.
विषय : १) नियो. संस्थेचे मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची निवड करणे.
२) नियो. संस्थेच्या पुनर्वसन योजना राबविणेकामी विकासक व वास्तुविशारद यांची नियुक्ती करणे.

सही-
(एच. आर. गावडे)
प्राधिकृत अधिकारी तथा
सहकारी अधिकारी,(श्रेणी-२) झोपुप्रा, बृहन्मुंबई

टीप :
१) सदर सभेस फक्त प्रारूप यादीतील झोपडीधारकांनीच (पती/पत्नी) स्वतः ची ओळख होईल अशा मुळ ओळखपत्रासह विहीत वेळेत उपस्थित राहावे. अन्य व्यक्तीस उपस्थित राहता येणार नाही.
२) सदर सभेसाठी पात्र झोपडीधारकांची वेळ सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंतच बायोमॅट्रीक उपस्थिती नोंद घेण्यात येईल.
३) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी सभा घेण्यात येईल. सदर सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.
४) सदर सभेच्या कामकाजाचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येणार आहे.
५) संस्थेच्या पात्र सभासदांना सभागृहात प्रवेश देतेवेळी त्यांनी त्यांची ओळख पटवुन सभेच्या उपस्थिती नोंदवहीत स्वाक्षरी करुन व बायोमॅट्रिक पध्दतीने उपस्थिती नोंदविल्यानंतरच सभागृहात प्रवेश दिला जाईल.

प्रति :
१) श्री / श्रीम..... परि-२ मधील अनु.क्र.....(नियोजित) तारा कम्पाऊंड एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, न.मु.क्र. ३/ अ (भाग), मौजे आंबिवली, तालुका अंधेरी, यादव नगर, बांदिवली, हिल रोड, जोगेश्वरी (प), मुंबई-४००१०२.
२) संस्थेच्या नोटिस बोर्डावर माहिती व प्रसिध्दीसाठी.
३) मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पुर्व व पश्चिम उपनगरे), झोपुप्रा, बृहन्मुंबई

PRO/SRA/88/2024

नविन प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४००.०५१
दुरध्वनी : २६५६५८००, २६५९०४०५/ १८७९ संकेतस्थळ: www.sra.gov.in ई-मेल : info@sra.gov.in

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
पत्ता:- वजिराबाद नांदेड ई-मेल **पत्ता** :- info@nwmcnanded.org
दुरध्वनी (०२४६२) २३४४०४